**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०९/२०१५-१६/१४७ दिनांक: ४-११-२०१५

**आदेश केस क्र. ०९/२०१५-२०१६**

१) श्री. जयवंत हिंदुराव पिसाळ : अर्जदार.
मु. पो. लवंडमाची पो. किल्हे मच्छिद्रगड,
ता. वाळवा, जिल्हा. सांगली

विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग इस्लामपूर-१

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

(१) तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी .

आज दिनांक २७-१०-२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर येथे अर्जदार ग्राहक श्री. जयवंत हिंदुराव पिसाळ, मु. लवंडमाची, पो. किल्ले मच्छिंद्रगड, ता. वाळवा, जिल्हा. सांगली, हे स्वतः सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर होते. महावितरण तर्फे श्री. प्रदीप सुरवसे, उपकार्यकारी अभियंता, इस्लामपूर-१, हे सुनावणीसाठी उपस्थित होते.

अर्जदार श्री. पिसाळ यांनी शेतीसाठी कनेक्शन मिळावे म्हणून दिनांक २७-०८-२०१४ रोजी रक्कम रुपये २५४६/- भरलेली आहे. त्यांना वीज पुरवठा न मिळाल्याने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली येथे परिशिष्ठ - क्ष मध्ये तक्रार दाखल केली. त्याचा निकाल २६-०५-२०१५ रोजी क्र. ४५५५ नुसार यांना मिळाला. यातील आशय खालील प्रमाणे.

कार्यकारी अभियंता, महावितरण इस्लामपूर विभाग यांना सुचना देणेत येते की, जेष्ठता यादीमध्ये सदर अर्जदाराचा कितवा क्रमांक आहे याची माहिती ग्राहकांना देणेत यावी. तसेच पैसे भरुन प्रलंबीत असलेल्या शेतीपंप -१ उपविभाग, यांनी जेष्ठता यादीप्रमाणे विदयुत पुरवठा करावा व जेष्ठता यादीमध्ये सदर अर्जदाराचा कितवा क्रमांक आहे. याची माहिती अर्जदारांना लेखी पत्राव्दारे दयावी या निकालावर ग्राहकाचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ०९-०६-२०१५ रोजी अनुसूची अ मध्ये गाऱ्हाण्याच्या निवारणासाठी मंचाकडे अर्ज केला आहे आणि नवीन घरगुती वीज कनेक्शन त्वरीत मिळावे अशी आपेक्षा व्यक्त केली आहे.

आज रोजी प्रत्यक्ष चर्चेमध्ये श्री. पिसाळ यांनी आपले घरामधील आजारी व्यक्ती असलेमुळे आणि लाईट शिवाय आमची अत्यंत आडचण होत आहे, असे सांगीतले. चर्चे दरम्यान उपकार्यकारी अभियंता श्री. विक्रांत सपाटे यांनी १५९ पैकी ७० कामे पुर्ण झाल्याचे नमुद केले आणि यांचेही काम जेष्ठता यादीप्रमाणे करणार असल्याचे सांगीतले. प्रत्यक्ष चर्चा आणि सादर केलेली कागदपत्रे यावर चर्चे दरम्यान खालील मुददे उपस्थित होतो.

१. अर्जदार श्री. पिसाळ यांना विदयुत कनेक्शन त्वरीत देता येईल काय.?
उत्तर : होय.
२. आदेश.
उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे.

**कारण मिमंसा.**

श्री. पिसाळ यांनी घरगुती कनेक्शन मिळावे यासाठी दिनांक १५-०४-२०१४ रोजी पैसे भरलेले आहेत. श्री. पिसाळ एक वर्षाहून अधिक काळ वीज जोडणीपासून वंचीत आहेत. त्यामुळे मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता इतर अटी ) विनिमय २००५ कलम ४.४ व अधिनियमाच्या कलम ४३ नुसार विनिमयामध्ये नमुद केलेल्या कालमर्यादेत वीजेचा पुरवठा करण्याच्या बंधनास अधीन राहून वीज पुरवठा करण्यात यावा, यानुसार श्री. पिसाळ यांना त्वरीत वीज पुरवठा होणे आवश्यक आहे. या निष्कर्षाप्रत मंच आला आहे. सबब, मुददा क्र. १ उत्तर होय असे आहे. महावितरण कार्यालय यांनी श्री. पिसाळ यांना दि. २८-११-२०१५ पुर्वी विद्युत पुरवठा करुन मंचास तसे अवगत करावे.

## आदेश

१) तक्रार दाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) महावितरणने २८-११-२०१५ पूर्वी विद्युत पुरवठा करणेचा आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : २७-१०-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.